प्रधान सचिव
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
महाराष्ट्र शासन

प्रस्तावना

राज्यातील दारिद्र्यरेषेखालील आणि दुर्गम भागातील पात्र कुटुंबांना निवडक जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरामध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था हे एक माध्यम आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था ही केंद्र व राज्य शासन यांच्या संयुक्त जबाबदारीने चालविली जाते. या योजनेची माहिती सर्व नागरिकांना असणे अत्यंत गरजेचे तर आहेच आणि त्या आधारे सदर योजना प्रभावीपणे व पारदर्शकतेने राबविण्यासाठी आपला म्हणजेच नागरिकांचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे.

या विभागामार्फत देण्यात येणा-या विविध प्रकारच्या लोकोपयोगी सेवा, त्याचे निकष, कालमर्यादा तसेच तक्रार निवारण पध्दत याबाबतची माहिती नर्गारिकांना व्हावी यासाठी विभागाची नागरी सनद तयार करण्यात आली आहे. त्यामुळे प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शी व अधिक बळकट होईल अशी अपेक्षा आहे. जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा, ग्राहक संरक्षण व वजन मापे कायद्याची अंमलबजावणी, शेतक-यांना त्यांच्या धान्याला योग्य हमीभाव मिळावा यासाठी आधारभूत योजनेखाली धान्य खरेदी ही प्रमुख कार्ये पार पाडतांना त्यात नागरिकांचा सहभाग मिळवून सदर कामांच्या अधिक प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणीच्या दृष्टिने या नागरी सनदेतील माहिती निश्चितच उपयुक्त ठरेल.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व संगणकीकरणाच्या माध्यमातून सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक प्रभावी, परिणामकारक व सक्षम करावयाची शासनाची तयारी आणि त्याला नागरी सनदेच्या माध्यमातून अधिक बळकटीकरण करण्याच्या हेतूने नागरिकांच्या प्रत्यक्ष सहभागाची जोड देऊन सदर यंत्रणा ही लोकाभिमुख, प्रतिसादशील होऊन प्रशासनाची जनमानसातील प्रतिमा उंचावण्यास त्याची निश्चितच मदत होईल, याची मला खात्री आहे.

दि० २/८/२०१८

(महेश पाठक)
प्रधान सचिव
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

विषयसूची

अ.क्र.	विषय	पृष्ठ क्रमांक
	भाग-१ (अन्न व नागरी पुरवठा विभाग)	
	विभागाचे उद्दिष्ट व संरचना	३
१	राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम-२०१३	४-५
२	जीवनावश्यक वस्तु अधिनियम-१९५५	५-६
३	अन्नधान्य वितरणाची सुधारीत पध्दत	६
४	शिधापत्रिका	
	(अ) नवीन शिधापत्रिकेकरिता आकारण्यात येणारे दर	६-७
	(ब) कामे पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा	७
	(क) तक्रार कोणाकडे करावी	८
	(ड) तिहेरी शिधापत्रिका योजना	८-९
	(इ) अपात्र शिधापत्रिका शोध मोहिम	९
५	अंत्योदय अन्न योजना	९-१०
६	रास्तभाव/शिधावाटप दुकाने	
	अ) राज्यातील रास्तभाव/शिधावाटप दुकान व केरोसीन परवाने मंजूर करण्याबाबतचा निर्णय	१०
	(आ) रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसिन परवाने मंजूर करण्याबाबत करावयाची कार्यवाही.	१०-११
	(इ) दुकानदारांच्या मृत्युनंतर त्यांच्या वारसास रास्तभाव/ शिधावाटप दुकानाचा परवाना मंजूर करणे	१२
	(ई) शिधावाटप दुकान मंजूरीसाठी कालमर्यादा	१२-१३
	(उ) परवाना देणारे प्राधिकारी आणि दाद मागण्यासाठी यंत्रणा	१३
	(ऊ) रास्तभाव दुकानांच्या तपासण्या	१३
	(ऋ) नवीन रास्तभाव/शिधावाटप दुकान देण्याचे निकष	१४
७	पेट्रोल पंप व गॅस एजन्सी	१४-१५
८	केरोसिन परवाना मंजूर करण्याची कार्यपध्दती	१५-१६
९	सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण	१६-१७
१०	महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम -२०१५	१७
११	जिल्हा तक्रार निवारण अधिकारी	१७-१८
	विवरणपत्र १ ते ४	१९-२३

भाग-२ वैधमापनशास्त्र यंत्रणा		
१२	अ) वजन वा मापांची पडताळणी व मुद्रांकन	२४
	आ) वजन माप विषयक परवाने	२४-२५
	इ) वजन वा माप आणि आवेष्टित वस्तू नियम विषयक तरतुदींचा भंग	२५-२६
	ई) वैधमापनशास्त्र यंत्रणेमार्फत करण्यात येणारी कार्ये, जबाबदार अधिकारी, कार्यपूर्ती कालावधी व याबाबत तक्रार विषयी अधिकारी यांचा तपशिल.	२६
भाग - ३ (ग्राहक संरक्षण विभाग)		
१३	(अ) राज्य ग्राहक संरक्षण परिषद	२७
	(आ) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद	२७
	(इ) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ ची अंमलबजावणी	२८
	(ई) राज्य ग्राहक हेल्पलाईन	२८

भाग-१

अन्न व नागरी पुरवठा विभाग

उद्दिष्ट :-

जीवनावश्यक वस्तू रास्तभावात आणि ठराविक प्रमाणात उपलब्ध करून देण्याकरिता "सार्वजनिक वितरण व्यवस्था" या विभागामार्फत कार्यान्वित केलेली आहे.

पुरवठा विभागाची संरचना:-

मंत्री
↓
राज्यमंत्री
↓
सचिव तथा पुरवठा आयुक्त

↓ नियंत्रक, शिधावाटप, मुंबई (मुंबई, ठाणे शिधावाटप क्षेत्र)
↓ उप नियंत्रक, शिधावाटप
↓ शिधावाटप कार्यालय

↓ उपायुक्त (पुरवठा) (६ महसूल विभाग)
↓ जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी
↓ तहसील कार्यालय
↓ शिधावाटप कार्यालय

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे घटक:-

मुंबई, ठाणे शिधावाटप क्षेत्र :- नियंत्रक, शिधावाटप, मुंबई यांच्या नियंत्रणाखालील विभागीय परिमंडळ कार्यालये व त्याखालील विविध शिधावाटप कार्यालयांमधून हे काम चालते. मुंबई, ठाणे शिधावाटप क्षेत्रात पाच विभागीय परिमंडळ कार्यालये व त्याखालील ४६ शिधावाटप कार्यालये कार्यान्वित आहेत.

जिल्हा स्तर :- जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली पुरवठा विभागाचे काम जिल्हा पुरवठा अधिकारी व त्यांचे कार्यालय पाहते.

तालुका स्तर :- तहसील दाराच्या नियंत्रणाखाली पुरवठा शाखा हे काम पाहते. पुणे, नागपूर, सोलापूर अशा मोठ्या शहरांमध्ये तहसील दारांच्या कार्यालयाऐवजी झोनल ऑफीसमधून पुरवठा विभाग हे काम पाहते.

१) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ :-

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ केंद्र शासनाने दि. ५ जुलै, २०१३ पासून लागू केला आहे. राज्यात सदर अधिनियमाची अंमलबजावणी दि. १ फेब्रुवारी, २०१४ पासून करण्यात येत आहे.

महाराष्ट्रासाठी ग्रामीण भागातील ७६.३२% व शहरी भागातील ४५.३४% नागरिक प्रत्येक महिन्यास अनुदानित दराने धान्य मिळण्यास हक्कदार आहेत. याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात एकूण ७,००,१६,६८४ एवढा लाभार्थ्यांना इष्टांक देण्यात आला आहे.

- **राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांची निवडीसाठीचे निकष**

    १) लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजनेचे सर्व लाभार्थी या अधिनियमांतर्गत "अंत्योदय अन्न योजनेचे लाभार्थी" म्हणून पात्र असून बीपीएलचे सर्व लाभार्थी हे या अधिनियमांतर्गत "प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थी" म्हणून विचारात घेण्यात आले आहेत.

    २) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंब गटातील उर्वरित लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी शहरी भागात कमाल ₹५९,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या व ग्रामीण भागात ₹४४,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या एपीएल (केशरी) लाभार्थी पात्र आहेत.

अंत्योदय अन्न योजनेखालील सर्व कुटुंबांना प्रति शिधापत्रिका प्रतिमाह ३५ किलो धान्य व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो धान्य अनुज्ञेय आहे. पात्र लाभार्थ्यांना ₹३/- प्रति किलो या दराने तांदूळ, ₹२/- प्रति किलो या दराने गहू व ₹१/- प्रति किलो या दराने भरडधान्य देण्याची तरतूद सदर अधिनियमात आहे.

अधिनियमांतर्गत कलम ८ नुसार पात्र व्यक्तीस अन्न/आहार न मिळाल्यास केंद्र शासन निश्चित करेल त्या कालावधीकरिता व पध्दतीनुसार राज्यशासनाकडून अन्नसुरक्षा भत्ता घेण्यास त्या व्यक्ती हक्कदार असतील, अशी तरतूद आहे.

महिला सक्षमीकरण करण्याच्या हेतूने कलम १३ नुसार पात्र कुटुंबातील ज्येष्ठ महिला ही शिधापत्रिकेकरिता कुटुंब प्रमुख राहील, अशी तरतूद आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत योग्य व गरजू लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ मिळावा या उद्दिष्टासाठी "अनुदानातून बाहेर पडा" (Opt Out of Subsidy) ही योजना सुरु करण्याचा निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

* राज्य अन्न आयोग स्थापना :-

दि.११ एपिल, २०१७ च्या अधिसूचनेद्वारे राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ (२०१३ चा २०) मधील कलम १६ (१) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन, राज्य शासनाने राज्य अन्न आयोग गठीत केला असून, त्यावर अध्यक्ष व इतर ४ सदस्यांची नेमणूक करण्यात आली असून दि.२ मे, २०१७ च्या अधिसूचनेन्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कलम १६ (२) मधील तरतुदीनुसार आयोगातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या सदस्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ च्या कलम १६ (६) मध्ये नमूद केलेली कार्ये सदर अन्न आयोग पार पाडील.

* **कल्याणकारी संस्था, वसतिगृहे, आश्रमशाळा इत्यादी संस्थांना बीपीएल दराने धान्य वितरणाची योजना**

राज्यातील कल्याणकारी संस्थांना प्रत्येक लाभार्थ्यास (inmates) दरमाह १५ किलो याप्रमाणे धान्याचे वितरण करण्याकरीता केंद्र शासन बी.पी.एल. दराने अन्नधान्याचे (गहू व तांदूळ) अतिरिक्त नियतन मंजूर करते

* **केंद्रीय अन्नपूर्णा योजना**

राज्यात केंद्रीय अन्नपुर्णा योजनेची अंमलबजावणी दि.१ एप्रिल, २००१ पासून सुरू करण्यात आलीया योजनेअंतर्गत ६५ वर्षे किंवा त्यावरील निराधार स्त्री/पुरूष यांना दरमहा १० किलो धान्य मोफत देण्यात येते. प्रामुख्याने ज्या व्यक्तींना केंद्र वा राज्य पुरस्कृत योजनेअंतर्गत निवृत्ती वेतन योजनेचा लाभ मिळत नाही, अशी व्यक्ती या योजनेसाठी पात्र आहे.

२) जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५

जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या तरतुदीनुसार जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा, वाटप, साठा यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी विविध सांविधिक आदेशामध्ये तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. सांविधिक आदेशातील तरतुदींचे संबधित परवानाधारकांकडून उल्लंघन झाल्यास परवाना प्राधिकारी म्हणजेच संबधित जिल्हा पुरवठा अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी तसेच मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात परिमंडळीय उपनियंत्रक, शिधावाटप हे संबधित परवानाधारकाच्या केरोसीन परवान्याची अथवा रास्तभाव/अधिकृत शिधावाटप दुकानाच्या प्राधिकारपत्राची अनामत रक्कम अंशत:/पूर्ण सरकारजमा करण्याची कारवाई करतात अथवा रद्द/निलंबित करतात. अशा आदेशाविरुद्ध व्यथित होऊन संबंधित परवानाधारक उप आयुक्त (पुरवठा) यांच्याकडे पुनरीक्षण/अपील अर्ज दाखल करतात. परवानाधारकाने आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीत उप आयुक्त (पुरवठा) यांचेकडे पुनरीक्षण अर्ज करणे आवश्यक आहे. प्राप्त पुनरीक्षण अर्जावर उप आयुक्त (पुरवठा) यांनी योग्य तो निर्णय घ्यावयाचा आहे. मुंबई/ठाणे शिधावाटप

C:\Users\archana.parnerkar\Desktop\नागरीकांची सनद २०१६ अंतिम.docx

क्षेत्रात संबंधित परवानाधारकांविरुद्ध नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांना कारवाई करण्याबाबत प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

उप आयुक्त (पुरवठा) तसेच नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांच्या आदेशाने व्यथित झालेले परवानाधारक आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या कालावधीत मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण/ मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्यासमोर आदेशाच्या प्रती व विहीत शुल्क असलेल्या कोर्ट फी स्टँपसह पुनरीक्षण/पुनर्विलोकन अर्ज दाखल करुन दाद मागू शकतात. सदर अर्जावर मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांच्यामार्फत उचित निर्णय घेण्यात येतो. मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांच्या आदेशाविरूद्ध पुनर्विलोकन दाखल करावयाचे असल्यास अपिलार्थीने आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत मा.मंत्री/मा. राज्यमंत्री यांच्यासमोर पुनर्विलोकन अर्ज सादर करणे आवश्यक असते. अशा पद्धतीने दाखल करुन घेतलेल्या पुनरीक्षण/ पुनर्विलोकन अर्जावर मा.मंत्री/मा.राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यथावकाश सुनावणी घेऊन अंतिम निर्णय/आदेश पारित करतात. मा.मंत्री/मा.राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांनी पुनर्विलोकन अर्ज प्रकरणी पारीत केलेल्या आदेशाविरूद्ध परवानाधारक मा.उच्च न्यायालयात दाद मागू शकतात.

३) अन्नधान्य वितरणाची सुधारित पध्दत

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत निर्धारीत दराने व योग्य दर्जाचे धान्य शिधापत्रिकाधारकांना खात्रीशिररीत्या उपलब्ध होईल याची हमी देण्याच्या उद्देशाने शासनाने सुधारित धान्य वितरण प्रणाली राबविण्याबाबत दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२ रोजी निर्णय घेतला आहे. सदर सुधारित धान्य वितरण प्रणाली अंतर्गत, भारतीय अन्न महामंडळ गोदाम ते रास्तभाव दुकानापर्यंत जिल्हावार एकाच वाहतूकदारामार्फत शासकीय खर्चाने अन्नधान्याची वाहतूक करण्याचा निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

४) शिधापत्रिका

शिधावस्तू प्राप्त करुन घेण्यासाठी प्रत्येक कुटुंबाकडे शिधापत्रिका असणे आवश्यक आहे :- शिधापत्रिका मिळण्यासाठी शिधावाटप कार्यालय किंवा तहसील कार्यालयात विहित नमुन्यातील अर्ज अर्जदाराने स्वत: केला पाहिजे.

अ) नवीन शिधापत्रिकेकरिता आकारण्यात येणारे दर

अ.क्र.	पुरवठा /शिधापत्रिकेचा प्रकार	दर (रुपये)
१	नवीन पिवळी शिधापत्रिका	१०
२	नवीन केशरी शिधापत्रिका	२०
३	नवीन शुभ्र शिधापत्रिका	५०

अ.क्र.	पुरवठा /शिधापत्रिकेचा प्रकार	दर (रुपये)
४	दुय्यम पिवळी शिधापत्रिका	२०
५	दुय्यम केशरी शिधापत्रिका	४०
६	दुय्यम शुभ्र शिधापत्रिका	१००
७	शिधावाटप / पुरवठा कार्यालयातून दिले जाणारे विविध अर्जाचे नमुने (नमुना नंबर १ सह अर्जाचे सर्व नमुने)	२

शिधापत्रिका ही शासनाची मालमत्ता असल्यामुळे पुरवठा निरीक्षक किंवा इतर संबंधित अधिकारी मागणी करतील तेव्हा शिधापत्रिकाधारकाने त्यांना शिधापत्रिका दाखविली पाहिजे. **कोणत्याही व्यक्तीने एकापेक्षा अधिक शिधापत्रिका मिळविणे किंवा एकापेक्षा अधिक शिधापत्रिकेत नाव समाविष्ट करणे हा गुन्हा आहे.**

ब) कामे पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा

या शिधापत्रिकांसंबधीची नागरिकांची शिधावाटप कार्यालयातून /तहसील पुरवठा शाखेतून पूर्ण करण्यासाठी खालीलप्रमाणे कालमर्यादा विहित करण्यात आली आहे :--

अ.क्र.	कामाचे स्वरुप	कालमर्यादा
१	नवीन शिधापत्रिका मागणी	३० दिवस
२	शिधापत्रिकेतील नावात दुरुस्ती	३ कार्यालयीन दिवस
३	इतर राज्यातून आलेल्या अर्जदारास नवीन तात्पुरती शिधापत्रिका देणे	१५ दिवस
४	शिधापत्रिकेत नावे समाविष्ट करणे/ नाव वाढविणे	गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस अन्यथा ३ कार्यालयीन दिवस
५	शिधापत्रिकेतील नाव कमी करणे.	३ कार्यालयीन दिवस
६	शिधापत्रिकेतील पत्ता बदल करणे.	३० दिवस
७	शिधापत्रिकेत नवीन जन्मलेल्या मुलाचे नाव वाढविणे (जन्म दाखल्यासह)	१ दिवस
८	शिधापत्रिकेत नोंद असलेल्या लहान मुलांचे एकांके वाढविणे	१ दिवस
९	हरवलेल्या शिधापत्रिकेएवजी दुय्यम शिधापत्रिका देणे	३० दिवस
१०	फाटलेल्या/ खराब झालेल्या शिधापत्रिकेऐवजी दुय्यम शिधापत्रिका देणे	गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस अन्यथा ६ कार्यालयीन दिवस

क) तक्रार कोणाकडे करावी

शिधावाटप दुकान/शिधापत्रिका/शिधावस्तू याबाबतच्या तक्रारी संदर्भात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत पदनिर्देशित अधिकारी/ प्रथम अपिल अधिकारी व द्वितीय अपिल प्राधिकारी खालीलप्रमाणे घोषित करण्यात आलेले आहेत :-

अ.क्र.	क्षेत्र	कामकाजासाठी पदनिर्देशित अधिकारी	प्रथम अपिल अधिकारी	द्वितीय अपिल प्राधिकारी
१	मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र	शिधावाटप अधिकारी	सहायक नियंत्रक शिधावाटप	उप नियंत्रक, शिधावाटप
२	पुणे/नागपूर/सोलापूर	अन्नधान्य वितरण अधिकारी (श्रेणी-२)	अन्नधान्य वितरण अधिकारी (श्रेणी-१)	उप आयुक्त (पुरवठा)
३	इतर क्षेत्र	परिमंडळ अधिकारी/तहसीलदार	जिल्हा पुरवठा अधिकारी	उप आयुक्त (पुरवठा)

ड) तिहेरी शिधापत्रिका योजना

राज्यामध्ये दिनांक १ मे, १९९९ पासून त्रिकार्ड योजना लागू करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व शिधापत्रिकाधारकांना पुढील निकषाप्रमाणे तीन रंगाच्या शिधापत्रिका वितरित करण्यात येतात.

I. पिवळया शिधापत्रिकांसाठी निकष :-

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या (बी.पी.एल.) लाभार्थ्यांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकेसाठी :-

a) आयआरडीपीच्या सन १९९७-९८ च्या यादीत नांव समाविष्ट असणे व कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये १५,०००/- या मर्यादेत असले पाहिजे.
b) कुटुंबातील कोणतीही व्यक्ती डॉक्टर, वकील, स्थापत्य विशारद, चार्टड अकाऊन्टंट नसावी.
c) कुटुंबातील कोणतीही व्यक्ती व्यवसाय कर, विक्रीकर किंवा आयकर भरत नसावी किंवा भरण्यास पात्र नसावी.
d) कुटुंबाकडे निवासी दूरध्वनी नसावा.
e) कुटुंबाकडे चार चाकी वाहन नसावे.
f) कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या नांवे एकूण दोन हेक्टर जिरायत किंवा एक हेक्टर हंगामी बागायत किंवा अर्धा हेक्टर बारमाही बागायत (दुष्काळी तालुक्यात त्याच्या दुप्पट क्षेत्र) जमिन नसावी.

g) केंद्र शासनाने इष्टांक वाढवून दिल्याशिवाय बीपीएल लाभार्थ्यांची संख्या वाढविता येणार नाही. या अटीच्या अधीन राहून बीपीएलच्या पिवळया शिधापत्रिकांसाठी गॅस सिलेंडर व दुचाकी वाहन नसावे तसेच इतर अटी दिनांक २५ मे २००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये काढून टाकण्यात आल्या आहेत.

h) शासन निर्णय दिनांक ९ सप्टेंबर,२००८ अन्वये राज्यातील सर्व विडी कामगार तसेच सर्व पारधी व कोल्हाटी समाजाच्या कुटुंबांना आणि शासन निर्णय दिनांक २९ सप्टेंबर २००८ व २१ फेब्रुवारी २००९ अन्वये परित्यक्त्या व निराधार स्त्रियांना तात्पुरत्या स्वरुपात बी.पी.एल. शिधापत्रिका देण्याचा निर्णय घेतला आहे.

II. **केशरी शिधापत्रिकेसाठी निकष**

खालील अटींची पूर्तता करणाऱ्या कुटुंबांना केशरी शिधापत्रिका देण्यात येतात :-

a) कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये १५,०००/- पेक्षा जास्त परंतु १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त नसावे.

b) कुटुंबातील कोणाही व्यक्तीकडे चार चाकी यांत्रिक वाहन नसावे.(टॅक्सी चालक वगळून)

c) कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या नावे मिळून ४ हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त बारमाही बागायती जमिन असू नये.

III. **शुभ्र शिधापत्रिकांसाठी निकष**

ज्या कुटुंबातील सर्व व्यक्तींचे मिळून एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त असेल किंवा त्या कुटुंबातील कोणाही व्यक्तीकडे चार चाकी यांत्रिक वाहन असेल किंवा कुटुंबातील सर्व व्यक्तीच्या नावे मिळून चार हेक्टरपेक्षा जास्त बारमाही बागायती शेतजमीन असेल अशा कुटुंबांना शुभ्र शिधापत्रिका देण्यात येतात.

(इ) अपात्र शिधापत्रिका शोध मोहिम

सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण) आदेश,२००१ नुसार शिधापत्रिका तपासणी करणे आवश्यक आहे. राज्यातील अपात्र शिधापत्रिका शोधून रद्द करण्याकरिता शासन परिपत्रक दिनांक ११ सप्टेंबर,२००९ अन्वये विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

५) अंत्योदय अन्न योजना

सदर योजना मे, २००१ पासून राज्यात सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत अंत्योदय कुटुंबांना दरमहा ३५ किलो धान्य (गहू व तांदूळ) गहू रु. २.०० प्रति किलो व तांदूळ रु. ३.०० प्रति किलो या दराने देण्यात येते.

खालील प्रवर्गातील कुटुंबे पिवळ्या शिधापत्रिकाधारकातून निवडण्यात येतात:-

a) विधवा, अपंग, दुर्धर आजारग्रस्त व ६० वर्षांवरील वृद्ध कुटुंब प्रमुख असलेली कुटुंबे,

b) एकट्या रहात असलेल्या विधवा, अपंग, दुर्धर आजारग्रस्त व ६० वर्षावरील वृद्ध,

c) सर्व आदिम जमातीची कुटुंबे,

d) भूमीहीन शेतमजूर, अल्प भूधारक शेतकरी, ग्रामीण कारागीर उदा. कुंभार, चांभार, मोची, विणकर, सुतार तसेच झोपडपट्टीतील रहिवासी विशिष्ट क्षेत्रात रोजंदारीवर काम करून उपजिविका करणारे नागरिक जसे हमाल, मालवाहक, सायकल-रिक्षा चालविणारे, हातगाडीवरून मालाची ने-आण करणारे, फळे आणि फुले विक्रेते, गारुडी, कचऱ्यातील वस्तू गोळा करणारे तसेच निराधार व अशा प्रकारे काम करणारे शहरी तसेच ग्रामीण भागातील व्यक्तीची कुटुंबे,

e) एचआयव्ही/एड्स बाधीत नागरिकांना तसेच कुष्ठरोग्यांना प्राधान्य देण्यात येते.

६) रास्तभाव/शिधावाटप दुकाने

(अ) राज्यातील रास्तभाव/ शिधावाटप दुकान व केरोसीन परवाने मंजूर करण्याबाबतचा निर्णय:-

राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ लागू असून, या अधिनियमातील कलम, १२ (१) (e) मधील तरतुदी खालीलप्रमाणे आहे :-

"पंचायती, स्वयंसहायता गट, सहकारी संस्था, यासारख्या सार्वजनिक संस्थांना किंवा सार्वजनिक न्यासांना रास्तभाव दुकानांचे व्यवस्थापन करणे."

त्यानुसार सध्याची रास्तभाव दुकाने/किरकोळ केरोसिन परवाने तसेच ठेवून आजमितीस रद्द असलेली व यापुढे रद्द होणारी, राजीनामा दिलेली व लोकसंख्या वाढीमुळे द्यावयाची नवीन तसेच, विविध कारणांमुळे भविष्यात द्यावयाची नवीन रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसिन परवाने खालील प्राथम्यक्रमानुसार मंजूर करण्यात येतात :-

१. पंचायत, (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था)
२. नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गट
३. नोंदणीकृत सहकारी संस्था
४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था
५. महिला स्वयंसहायता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था

या नवीन मंजूर केलेल्या दुकानांचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुदयाद्वारे करणे आवश्यक आहे.

(आ) रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसिन परवाने मंजूर करण्याबाबत करावयाची कार्यवाही.

i. **जाहीरनामा प्रसिध्द करणे:-**

अ) ज्या गावात/क्षेत्रात, नवीन रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसिन परवाना मंजूर करावयाचा असेल तेथे एकाच वेळी एकत्रित जाहीरनामा प्रसिध्द करण्यात यावा.

आ) ज्या गावात/क्षेत्रात, रास्तभाव दुकान अस्तित्वात असेल व आता फक्त किरकोळ केरोसिन परवाना मंजूर करावयाचा असेल तेथे फक्त किरकोळ केरोसिन परवाना मंजूर करण्यासाठी जाहीरनामा प्रसिध्द करण्यात यावा.

इ) ज्या गावात/क्षेत्रात, रास्तभाव दुकान अस्तित्वात असेल व आता फक्त रास्तभाव दुकान मंजूर करावयाचे असेल तेथे फक्त रास्तभाव दुकान मंजूर करण्यासाठी जाहीरनामा प्रसिध्द करण्यात यावा.

ii. **गटांकडून अर्ज मागविणे व गटाची निवड करणे.**

प्रसिध्द केलेल्या जाहीरनाम्यास प्रतिसाद म्हणून संबंधित गावातील/ क्षेत्रातील गटांना अर्ज करता येईल. अशा गटांकडून आलेल्या अर्जांमधून गटांची निवड प्राथम्यक्रमानुसार खालीलप्रमाणे करण्यात येते :-

अ) प्राथम्यसूचीनुसार गटांची निवड करतांना, ज्येष्ठ, वर्धनक्षम व नियमित कार्यरत असलेल्या अंतर्गत व्यवहार पारदर्शक व परतफेड चोख व नियमित असलेल्या व प्रतिवर्षी लेखापरिक्षण केलेल्या गटास प्राधान्य देण्यात यावे. निवड करावयाच्या गटाचे हिशेब व लेखे अद्ययावत असावेत व परतफेडीचे प्रमाण किमान ८०% असावे.

आ) गटांची निवड करण्याचे काम सध्याचे रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसिन मंजूर करणारे परवाना प्राधिकारी यांच्या अध्यक्षतेखालीली समिती करेल. (सध्या मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई तसेच पुणे नागपूर व सोलापूर शहरात संबंधित अन्नधान्य वितरण अधिकारी आणि उर्वरित अन्य क्षेत्रात संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी हे परवाना मंजूर करणारे प्राधिकारी आहेत.)

इ) या समितीमध्ये संबंधित जिल्हा समन्वयक, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणा किंवा त्यांचा किमान गट, ब दर्जाचा प्रतिनिधी व संबंधित तहसील दार हे सदस्य असतील. आदिवासी प्रकल्प क्षेत्रातील तालुक्यांमध्ये, प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास, महानगरपालिका क्षेत्रात संबंधित प्रभाग अधिकारी व नगरपालिका क्षेत्रात मुख्याधिकारी, नगरपालिका यांना या समितीवर सहसदस्य म्हणून घेण्यात यावे

ई) समितीच्या निर्णयानुसार, ग्रामीण क्षेत्रात संबंधित गटास रास्तभाव दुकानाचे प्राधिकारपत्र किंवा किरकोळ केरोसिन परवाना देण्यापूर्वी परवाना प्राधिकारी , सदर प्रस्ताव महिला ग्रामसभेकडे विचारार्थ व शिफारशीसाठी पाठविला व महिला ग्रामसभेची शिफारस विचारात घेऊन दुकान मंजूरीबाबत अंतिम निर्णय घेईल.

उ) जाहीरनामा प्रसिध्द करुनही रास्तभाव दुकान व किरकोळ केरोसिन परवाने मंजूर करण्यासाठी, पात्र गट उपलब्ध होणार नाहीत, अशा ठिकाणी पुन्हा जाहीरनामा काढून प्राथम्यसूचीनुसार रास्तभाव दुकाने/ किरकोळ केरोसिन परवाने मंजूर करण्यात यावेत.

(इ) दुकानदारांच्या मृत्युनंतर त्यांच्या वारसास रास्तभाव/शिधावाटप दुकानाचा परवाना मंजूर करणे

a) दुकानदाराच्या मृत्युनंतर त्याच्या नावावरील दुकान त्वरीत रद्द करण्यात यावे.

b) त्याच्या वारसास रास्तभाव दुकान तात्पुरत्या स्वरुपात चालविण्यास त्वरीत परवानगी द्यावी.

c) मृत दुकानदाराच्या वारसास खालील अटींच्या अधिनतेने दुकानाचा परवाना नव्याने द्यावा:-

i. मृत दुकानदाराच्या कालावधीत दुकानाच्या कामकाजाबाबत गंभीर तक्रारी आलेल्या नसाव्यात.

ii. ज्या वारसाच्या नावे परवाना द्यावयाचा आहे त्या वारसाला इतर वारसांची स्पष्ट व लेखी संमती असली पाहिजे. वारसांमध्ये कोणतेही मतभेद असल्यास कोणत्याही वारसाच्या नावे परवाना देऊ नये.

iii. ज्या वारसाच्या नावे परवाना द्यावयाचा आहे तो दुकान चालविण्यास सक्षम असावा, नेहमीच्या अटीप्रमाणे त्याच्याकडे पुरेशी जागा, भांडवल इत्यादी बाबी असाव्यात.

iv. वारसाने शिधावाटप/रास्तभाव दुकान स्वत: चालविले पाहिजे.

v. संबंधित वारसाचा चरितार्थ संबंधित रास्तभाव दुकानावर पूर्णत: अवलंबून असला पाहिजे.

vi. वारसामध्ये पती किंवा यथास्थिती पत्नी तसेच सज्ञान मुलगा, सज्ञान अविवाहीत मुलगी, अवलंबित आई किंवा वडील किंवा सून यांचाच फक्त समावेश राहील. (तसेच, अशा सुनेने पुर्नविवाह केल्यास परवाना रद्द होईल. त्याचप्रमाणे, पत्नीच्या नावे असलेला परवाना तिच्या मृत्यूनंतर पतीच्या नावे केल्यानंतर, अशा पतीने पुर्नविवाह केल्यास असा परवाना रद्द होईल. तसेच, पतीच्या नावे असलेला परवाना त्याच्या मृत्यूनंतर पत्नीच्या नावे केल्यानंतर, अशा पत्नीने पुर्नविवाह केल्यास परवाना रद्द होईल.)

vii. वारसाच्या नावे परवाना देण्यासाठी जाहीरनामा काढण्याची गरज नाही.

viii. ज्या ठिकाणी वारसास कोणत्याही कारणाने परवाना देता आला नाही तर, नेहमीच्या पध्दतीने जाहीरनामा काढून दुकान मंजूरीची कार्यवाही करण्यात यावी.

(ई) शिधावाटप दुकान मंजूरीसाठी कालमर्यादा

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरण करण्यात येणाऱ्या शिधावस्तू कार्डधारकांना सहजपणे उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने नवीन शिधावाटप दुकान मंजूर करणे यासाठी कालमर्यादा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ अंतर्गत पुढीलप्रमाणे विहीत करण्यात आली आहे :-

अ. क्र.	कामाचे स्वरुप	कालमर्यादा
१.	नवीन रास्तभाव दुकानाची मंजूरी.	जाहीरनामा काढल्यानंतर १८० दिवस
२.	रास्तभाव दुकानाच्या परवान्याचे नुतनीकरण.	६० दिवस

(उ) परवाने देणारे प्राधिकारी व दाद मागण्यासाठी यंत्रणा

नवीन रास्तभाव/शिधावाटप दुकानाचा परवाना देण्यासाठी सक्षम प्राधिकारी व एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेस असा परवाना नाकारण्यात आल्यास त्याविरुध्द दाद मागण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ अंतर्गत खालीलप्रमाणे व्यवस्था उपलब्ध आहे:-

अ.क्र	क्षेत्र	परवाना देण्यासाठी पदनिर्देशित अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकारी	द्वितीय अपिल प्राधिकारी
१.	मुंबई शिधावाटप क्षेत्र	नियंत्रक शिधावाटप मुंबई	विभागीय आयुक्त	सचिव
२.	पुणे/नागपूर/ सोलापूर शहर	अन्नधान्य वितरण अधिकारी	संबंधित जिल्हाधिकारी	संबंधित विभागीय आयुक्त
३.	इतर क्षेत्र	जिल्हा पुरवठा अधिकारी	जिल्हाधिकारी	विभागीय आयुक्त

(ऊ) रास्तभाव दुकानांच्या तपासण्या

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधावस्तुचे वितरण शिधापत्रिकाधारकांना व्यवस्थीत होण्याचे दृष्टीने रास्तभाव दुकानदारांच्या कारभारावर देखरेख ठेवण्याकरिता त्यांनी गैरव्यवहार करु नये यासाठी रास्तभाव दुकानांच्या नियमितपणे तपासण्या करण्यात येतात. याशिवाय अचानक तपासण्याही करण्यात येतात. या तपासण्या नियमितपणे व परिणामकारकरित्या करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी, जिल्हा पूरवठा अधिकारी, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच इतर कर्मचाऱ्यांनी करावयाच्या तपासण्याबाबतची मानके दि. १७ एप्रिल २००१ च्या परिपत्रकान्वये सुधारीत करण्यात आली आहेत. तसेच, तहसील दार, नायब तहसील दार, पुरवठा निरीक्षण अधिकारी व पुरवठा निरीक्षक यांना दरमहा नेमून दिलेल्या स्वतंत्र नियमित तपासण्यांपेकी निम्म्या म्हणजेच नियमित तपासण्या त्यांनी नजीकच्या तालुक्यातील रास्तभाव दुकानांच्या कराव्यात, अशा सूचना दि.२७ एप्रिल, २००२ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

(ऋ)नवीन रास्तभाव/शिधावाटप दुकान देण्याचे निकष

नवीन रास्तभाव/शिधावाटप दुकान मंजूर करताना, कोणत्याही शिधापत्रिकाधारकाला शिधावस्तू मिळण्यासाठी ५ किलोमीटरपेक्षा जास्त दूर जावे लागू नये हे शिधावाटप दुकानाची आवश्यकता ठरविण्यासंबंधातील शासनाचे धोरण आहे. शिधावाटप दुकानांना किती युनिट्स जोडावेत याचे निकष पुढीलप्रमाणे :-

अ) **मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र:-**

a) व्यक्तिकडून चालविले जाणारे शिधावाटप दुकान किमान ३००० व कमाल ८००० युनिट्स.

b) सहकारी संस्थेकडून चालविले जाणारे शिधावाटप दुकान किमान ३,००० व कमाल १०,००० युनिट्स.

ब) **इतर नागरी क्षेत्रे :-**

a) व्यक्तिकडून चालविले जाणारे शिधावाटप दुकान किमान २००० व कमाल ६००० युनिट्स.

b) सहकारी संस्थेकडून चालविले जाणारे शिधावाटप दुकान किमान २००० व कमाल ८००० युनिट्स.

क) **ग्रामीण क्षेत्रे :-**

a) व्यक्तीकडून किंवा सहकारी संस्थेकडून चालविले जाणारे रास्तभाव दुकान किमान १००० व कमाल ४००० युनिट्स किंवा २००० लोकसंख्या

ड) **दुर्गम आदिवासी क्षेत्रे :-**

दुर्गम आदिवासी क्षेत्रामध्ये पावसाळयात संपर्क तुटणाऱ्या गावांमध्ये २००० लोकसंख्येची अट शिथिल करुन आवश्यकता असल्यास ५०० लोकसंख्येचा स्वतंत्र महसुली गावात सुध्दा रास्तभाव दुकान उघडण्याचा जिल्हाधिकारी निर्णय घेऊ शकतात.

शिधावाटप दुकान मंजूर करण्यासाठी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येते. जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तर मुंबई, ठाणे शिधावाटप क्षेत्रात नियंत्रकांमार्फत अर्ज मागविण्यात येतात. ५,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावासाठी दुकान मंजूर, करावयाचे असल्यास वर्तमानपत्रातून जाहिरात प्रसिध्द करण्यात येत नाही. त्याऐवजी ग्रामपंचायतीच्या नोटीस फलकावर नोटीस लिहून किंवा दवंडी देऊन प्रसिध्दी देण्यात येते.

७. पेट्रोल पंप व गॅस एजन्सी

पेट्रोल पंप व एल.पी.गॅस वितरकांची नेमणूक केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार तेल कंपन्या करू शकतात. सर्वाधिक खपाच्या एका मराठी व एका इंग्रजी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तेल कंपन्या अर्ज मागवितात. त्यानंतर पात्र उमेदवारांचे डिलर निवड मंडळामार्फत मुलाखती घेऊन, डिलर शिफारशीनुसार पेट्रोल, डिझेल पंप व गॅस वितरकांची नेमणूक करण्यात येते.

गॅस, पेट्रोल व डिझेल वितरणाबाबत तक्रार अथवा सूचना करावयाच्या असल्यास तेल कंपन्यांचे कार्यालय, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, मेकर टॉवर, इ-विंग, १२वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०០००५ यांच्याकडे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे व अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडे कराव्यात.

८. केरोसिन परवाना मंजूर करण्याची कार्यपध्दती

अ) घाऊक व अर्धघाऊक परवाने

"दि.महाराष्ट्र सार्वजनिक वितरण व्यवस्था (पी.डी.एस.) केरोसीन घाऊक विक्रेता, अर्धघाऊक विक्रेता व हॉकर्स (अनुज्ञापन) आदेश, २००९" या आदेशांस स्थगिती असल्याने केरोसीन घाऊक परवाने " दि. महाराष्ट्र केरोसीन डिलर्स लायसेन्सिंग ऑर्डर, १९६६ " अनुसारच देण्यात येतात.

ब) हॉकर्स केरोसीन परवाने

"दि.महाराष्ट्र सार्वजनिक वितरण व्यवस्था (पी.डी.एस.) केरोसीन घाऊक विक्रेता, अर्धघाऊक विक्रेता व हॉकर्स (अनुज्ञापन) आदेश, २००९" या आदेशांस स्थगिती असल्याने हॉकर्स परवाने " दि. महाराष्ट्र केरोसीन डिलर्स लायसेन्सिंग ऑर्डर, १९६६ " अनुसारच देण्यात येतात.

क) केरोसीन टँकर ट्रॅकिंगसाठी GPS प्रणाजीचा वापर

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत होणाऱ्या केरोसीनचा काळाबाजार होऊ नये यासाठी उपाययोजना म्हणून राज्यातील सर्व जिल्हयामध्ये केरोसीन टँकरना ट्रॅकिंगसाठी GPS प्रणाली बसविण्यात आली आहे. केरोसीनची अवैध विक्री रोखण्यासाठी वेळोवेळी दुकानांच्या तपासण्या केल्या जातात. विविध स्तरावर दक्षता समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. परवानाधारकांविरूध्द तक्रारी प्राप्त झाल्यास दक्षता पथकांमार्फत धाडी टाकण्यात येतात. रॉकेलचा टँकर डेपोमधून निघाल्यानंतर त्या भागातील नागरीकांना एसएमएस व्दारे कळविले जाते.

ड) परवाना शुल्क (पृ.२७/प.वि.)

परवाना फी व व्यापाऱ्याकडील साठा मर्यादा याबाबतचा तपशील

अ.क्र.	आदेशाचे नाव	परवान्याचा प्रकार	परवाना फी रूपये	अनामत रक्कम रूपये	नूतनीकरण शुल्क रूपये	दुय्यम परवाना फी रूपये
१	दि. महाराष्ट्र केरोसीन डिलर्स लायसेन्सिंग ऑर्डर, १९६६	घाऊक	१००/-	१०००/-	७५/-	१०/-
		हॉकर्स	२०/-	१००/-	१५/-	१०/-

(इ) कालमर्यादा

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरण करण्यात येणाऱ्या किरकोळ केरोसिन विक्री परवाना व परवान्याचे नुतनीकरण करीता पुढीलप्रमाणे कालमर्यादा विहीत करण्यात आली आहे.:-

अ. क्र.	कामाचे स्वरुप	कालमर्यादा
१.	किरकोळ केरोसिन विक्री परवाना	९० दिवस
२.	किरकोळ केरोसिन विक्री परवान्याचे नुतनीकरण	६० दिवस

(ई) परवाने देणारे प्राधिकारी व दाद मागण्यासाठी यंत्रणा

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरण करण्यात येणाऱ्या किरकोळ केरोसिन विक्री परवाना व परवान्याचे नुतनीकरण करीता दाद मागण्यासाठी पुढील व्यवस्था उपलब्ध आहे:-

अ.क्र	क्षेत्र	परवाना देण्यासाठी पदनिर्देशित अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकारी	द्वितीय अपिल प्राधिकारी
१.	मुंबई शिधावाटप क्षेत्र	उपनियंत्रक, शिधावाटप	--	मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा
२.	पुणे/नागपूर/ सोलापूर शहर	अन्नधान्य वितरण अधिकारी	संबंधित जिल्हाधिकारी	संबंधित विभागीय आयुक्त
३.	इतर क्षेत्र	जिल्हा पुरवठा अधिकारी	जिल्हाधिकारी	विभागीय आयुक्त

९. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण.

सर्व शिधापत्रिकांचे डिजिटायझेशन करण्यात आले असून, त्यांचा तपशील विभागाच्या www.mahafood.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाद्वारे राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण संगणकीकरण करण्यात येत असून, याबाबत लाभार्थ्यांची बायोमेट्रीक ओळख पटवून शिधावस्तुंचे वाटप करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या प्रकल्पातंर्गत PoS मशिनमधून धान्य वितरण करण्यात येत आहे.

राज्यातील सर्व रास्तभाव दुकानांमध्ये मायक्रो एटीएम दर्जाच्या ई-पॉस मशीन्स बसविल्या असून, त्याद्वारे करण्यात येणाऱ्या धान्य वितरणाचा तपशील विभागाच्या www.mahafood.gov.in या संकेतस्थळावर "ऑनलाईन सेवा" या शिर्षकाखाली "ऑनलाईन रास्तभाव दुकाने" या लिंकवर उपलब्ध आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेची हेल्पलाईन

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत उद्भवणा-या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी हेल्पलाईन दिनांक १ मे, २०१२ पासून संपूर्ण राज्यात कार्यान्वित करण्यात आली आहे. या हेल्पलाईनचा टोल फी क्रमांक १८००-२२-४९५० व १९६७ हा आहे.

एस.एम.एस.गेट वे

शिधावाटप दुकान क्षेत्रातील संबंधित लोकांना त्यांच्यासाठी पाठविलेल्या धान्य व केरोसीन यांची माहिती व्हावी म्हणून दिनांक १ जुलै, २०१२ पासून एस.एम.एस. गेटवे कार्यान्वित करण्यात आलेला असून विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन ग्रुप एसएमएस पाठविण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

१०. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम - २०१५

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ हा दिनांक २८/४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या नियमानुसार **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पुरवठा विभागातंर्गत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या ७ सेवा व वैधमापनशास्त्र यंत्रणेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या ८ सेवा निश्चित करुन या सेवासंदर्भातील अधिसूचना अनुक्रमे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ व दि. ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आल्या आहेत.** सदर अधिसूचनांच्या अनुषंगाने अनुक्रमे दिनांक २२ जून, २०१६ व दि.२० सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर अधिसूचना व शासन निर्णयाच्या प्रती महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

११. जिल्हा तक्रार निवारण अधिकारी :-

दिनांक ७ एप्रिल, २०१७ च्या अधिसूचनेन्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ च्या कलम १५ मधील तरतुदीनुसार संबंधित जिल्ह्यांतील अन्नसुरक्षा योजनेशी संबंधित नसलेले “अपर जिल्हाधिकारी” यांची “जिल्हा तक्रार निवारण अधिकारी” म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील प्राप्त तक्रारीचे निराकरण करण्यासाठी सदर शिधावाटप क्षेत्र ज्या महसूली जिल्हयांमध्ये आहे, त्या मुंबई, मुंबई उपनगर व ठाणे या जिल्हयातील “अपर जिल्हाधिकारी” यांची या कार्यक्षेत्राचे जिल्हा तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मधील प्रकरण दोन अन्वये हक्क असलेले अन्नधान्य किंवा आहार यांच्या वितरणासंबंधी बाबींमध्ये व्यथित झालेल्या व्यक्तींची तक्रार शीघ्र व प्रभावी रितीने दूर करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

विवरणपत्र-१ :- परवाना शुल्क

परवाना फी व व्यापाऱ्याकडील साठा मर्यादा याबाबतचा तपशील

अ. क्र.	आदेशाचे नाव	परवाना प्रकार	परवाना फी रुपये	अनामत रक्कम रुपये	नूतनीकरण शुल्क रुपये	दुय्यम परवाना फी रुपये	व्यापाऱ्याने परवाना केव्हा काढावा	साठा मर्यादा	परवाना देणारी यंत्रणा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१	महाराष्ट्र अन्नधान्य व्यापार परवाना आदेश, १९९८	घाऊक	१,०००	५,०००	५००	२०	**अन्नधान्य :** ५० क्विंटल वा त्यापेक्षा जास्त अन्नधान्याचा धाऊक व्यवसाय करावयाचा असल्यास.	अन्नधान्य, डाळी, खाद्यतेल व तेलबिया यासाठी साठा मर्यादा नाही.	
							डाळी : ५ क्विंटल वा त्यापेक्षा जास्त डाळींचा घाऊक व्यवसाय करावयाचा असल्यास.		
							खाद्यतेल व तेलबिया : २० क्विंटल वा त्यापेक्षा जास्त खाद्यतेल व तेलबियांचा घाऊक व्यवसाय करावयाचा असल्यास.		
२	महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार परवाना आदेश, १९७९	अन्नधान्य	२००	५००	१००	२०	**अन्नधान्य :** महानगरपालिका क्षेत्रात १०० क्विंटल व इतरत्र ५० क्विंटलपेक्षा जास्त अन्नधान्याचा किरकोळ व्यवसाय करावयाचा असल्यास.	गव्हासाठी साठा मर्यादा महानगरपालिका क्षेत्रात १०० क्विंटल व इतरत्र ५० क्विंटल.	
		केरोसिन	५००	३,०००	२५०	२०	**डाळी :** ५० क्विंटल वा त्यापेक्षा जास्त डाळींचा किरकोळ व्यवसाय करावयाचा असल्यास.		
							खाद्यतेल : १५ क्विंटल वा त्यापेक्षा जास्त खाद्यतेलाचा किरकोळ व्यवसाय करावयाचा असल्यास.		

							खाद्यतेलबिया : ३० क्विंटल वा त्यापेक्षा जास्त खाद्यतेलबियांचा किरकोळ व्यवसाय करावयाचा असल्यास.		
३	महाराष्ट्र सार्वजनिक वितरण व्यवस्था (पीडीएस) केरोसिन घाऊक विक्रेता, अर्धघाऊक विक्रेता व हॉकर्स (अनुज्ञापन) आदेश, २००९	घाऊक	१,०००	१०,०००	५००	२०	नियंत्रित रॉकेल वितरणासाठी परवाना आवश्यक		
		अर्धघाऊक	५००	६,०००	२५०				
		हॉकर्स	२५०	२,०००	१२५				

विवरणपत्र-२
साठा मर्यादा

अ.क्र.	तरतूद	खाद्यतेल बिया (सोयाबीन वगळून)	खाद्यतेल
१	२	५	६
१	घाऊक व्यापारी	महानगरपालिका क्षेत्र:- *२००००* क्विंटल उर्वरीत ठिकाणी : *८०००* क्विंटल	महानगरपालिका क्षेत्र:- *१०००* क्विंटल उर्वरीत ठिकाणी : *३००* क्विंटल
२	किरकोळ व्यापारी	महानगरपालिका क्षेत्र:- *२०००* क्विंटल उर्वरीत ठिकाणी : *२०००* क्विंटल	महानगरपालिका क्षेत्र:- *४०* क्विंटल उर्वरीत ठिकाणी : *२०* क्विंटल
३	मिलर्स	मागील तीन वर्षापैंकी कोणत्याही वर्षी जास्तीत जास्त वापर केलेल्या तेलबियांच्या १/९ अथवा नव्याने चालू केलेल्या मिलसाठी वार्षिक क्षमतेच्या १/९ (दिड महिन्या इतकी)	मागील तीन वर्षापैंकी कोणत्याही वर्षी जास्तीत जास्त उत्पादनाच्या १/१८ अथवा नव्याने चालू केलेल्या मिलसाठी वार्षिक क्षमतेच्या १/१८ (पाऊण महिन्या इतकी)

विवरणपत्र-३

परवाना शुल्क

अ. क्र.	आदेशाचे नाव	प्रकार	परवाना फी रुपये	अनामत रक्कम रुपये	नूतनीकरण शुल्क रुपये	जीवनावश्यक वस्तू
१	महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार परवाना आदेश, १९९८	घाऊक	१०००	५०००	५००	तांदूळ व धान डाळी खाद्यतेल खाद्यतेल बिया
२	महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार परवाना आदेश, १९७९	किरकोळ	२००	५००	१००	

विवरणपत्र-४

नाफ्ता,सॉल्वंट व फ्रीसेल खालील आदेशान्वये मंजूर करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र नाफ्ता (अनुज्ञापन) आदेश २००९

२. महाराष्ट्र सॉल्व्हंट, रेफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश २००७

अ.क्र.	मुद्दा	नाफ्ता	सॉल्व्हंट्स
१.	अनुज्ञप्तीचा अर्ज फॉर्म-१	फॉर्म-१	फॉर्म-१
२.	अनुज्ञापक प्राधिकरण	नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई/ उप नियंत्रक, शिधावाटप, मुंबई व जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी	
३.	अनुज्ञप्ती शुल्क	रूपये १०००	रूपये १०००
४.	सुरक्षा अनामत	२०० मे.टना पर्यंत	रूपये ५०००
		२०१ ते ५०० मे. टनाकरिता	रू.२००००
		५०१ ते १००० मे. टनाकरिता	रू.३००००
		१००१ ते २००० मे. टनाकरिता	रू.४००००
		२००१ ते ३००० मे. टनाकरिता	रू.५००००
५.	नुतनीकरण शुल्क	रूपये ५००	रूपये ५००
६.	अनुज्ञप्तीचा कालावधी	१ वर्ष	१ वर्ष
७.	नुतनीकरणाचा कालावधी	एकावेळी २ वर्षाकरिता	एकावेळी २ वर्षाकरिता
८.	अनुज्ञप्तीच्या अर्जावर निर्णय घेण्यास लागणारा कालावधी	परिपूर्ण स्वरूपात अनुज्ञापक प्राधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावानंतर कामाचे ४५ दिवस	
९.	अपील/ पुनरिक्षण	राज्य शासन	मुंबई ठाणे शिधावाटप क्षेत्रात नियंत्रक, व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई व जिल्हास्तरावर विभागीय आयुक्त यांच्याकडे
१०.	स्वाधिकारे अपील/ पुनरिक्षण	राज्य शासन	राज्य शासन

C:\Users\archana.parnerkar\Desktop\नागरीकांची सनद २०१६ अंतिम.docx

भाग-२

वैधमापनशास्त्र यंत्रणा

उद्दिष्टे :- ग्राहकाला उचित दर्जाच्या, उचित मापाच्या वस्तू मिळतील, याची खात्री करणे.

संरचना :-

मंत्री
↓
राज्यमंत्री
↓
सचिव
↓
नियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई
↓

- **वैध मापन शास्त्र यंत्रणेमार्फत खालील प्रमुख अधिनियम व नियमांची अंमलबजावणी करण्यात येते** :-

    १) वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९.
    २) वैध मापन शास्त्र (आवेष्टित वस्तू) नियम, २०११.
    ३) वैध मापन शास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११.
    ४) महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११.
    ५) वैधमापन शास्त्र (नमूना मान्यता) नियम,२०११.
    ६) वैधमापन शास्त्र (न्युमरिक) नियम, २०११.
    ७) भारतीय विधीक माप संस्था नियम, २०११.

- उपरोक्त **अधिनियम/नियमांतील काही ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत**:-

(अ) **वजन वा मापांची पडताळणी व मुद्रांकन** - व्यापार उदिम व सुरक्षेच्या क्षेत्रातील वजन माप उपयोगकर्त्याकडील वजन व माप यांची नियतकालीक पडताळणी व मुद्रांकन करुन घेणे उपयोगकर्त्यास बंधनकारक आहे.

(आ) **वजन माप विषयक परवाने** - उपरोक्त अधिनियम/नियमातील तरतुदींनुसार विहीत परवाना असल्याखेरीज कोणासही वजन वा मापांचे उत्पादन, दुरुस्ती व विक्री करता येत नाही. यासाठी खालील परवान्यांची आवश्यकता असते.

a) **उत्पादक परवाना व त्याचे नुतनीकरण**- कोणत्याही वजन वा माप यांचे उत्पादन करण्यासाठी उत्पादक परवाना घेणे आवशक आहे. सदर परवाना नियंत्रक, वैध मापन शास्त्र कार्यालयाकडून देण्यात येतो. तसेच या परवान्याचे नुतनीकरण याच कार्यालयाकडून करण्यात येते.

b) **दुरुस्ती परवाना** - कोणत्याही वजन वा माप यांची दुरुस्ती करण्यासाठी दुरुस्तक परवाना घेणे आवशक आहे. दुरुस्तीचे कार्यक्षेत्र एकापेक्षा जास्त प्रादेशिक विभाग असल्यास सदर परवाना नियंत्रक, वैध मापन शास्त्र कार्यालयाकडून देण्यात येतो.

दुरुस्तीचे कार्यक्षेत्र फ़क्त प्रादेशिक विभाग असल्यास परवाना संबधित प्रादेशिक विभागाचे उपनियंत्रक, यांचेकडून देण्यात येतो.

c) **दुरुस्ती परवाना नुतनीकरण-** नियंत्रक कार्यालयाने दिलेल्या फक्त दुरुस्ती परवान्याचे नुतनीकरण सदर परवानाधारकाची कार्यशाळा ज्या प्रादेशिक विभागात आहे त्या प्रादेशिक विभागाचे उपनियंत्रक यांचेकडून केले जाते. प्रादेशिक विभाग उपनियंत्रक यांनी दिलेल्या परवान्याचे नुतनीकरण सदर परवानाधारकाची कार्यशाळा ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्ह्याचे सहायक नियंत्रक यांचेकडून केले जाते.

d) **विक्री परवाना व त्याचे नुतनीकरण-** अर्जदाराचे नोंदणीकृत कार्यालय ज्या जिल्ह्यात आहे त्या जिल्ह्याचे सहायक नियंत्रक यांचेकडून विक्री परवाना देण्यात येतो तसेच या परवान्याचे नुतनीकरणही त्यांचेकडूनच करण्यात येते.

इच्छूक व्यक्तींनी परवाना मिळविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे अर्ज करावयाचा असतो. अर्जाच्या छाननी नंतर जर इच्छुक व्यक्ती परवाना मिळण्यास पात्र आढळली तर त्यास परवाना दिला जातो. वरील सर्व परवाने सुरवातीस एक कॅलेंडर वर्षासाठी देण्यात येतात. परवान्यांचे नुतनीकरण करण्यासाठी अर्ज परवान्याची मुदत संपण्यापूर्वी ३० दिवस अगोदर करावा लागतो. अन्यथा परवान्याच्या विधीग्राह्य कालावधीत त्यास नियमीत शुल्कासह ५० टक्के अतिरिक्त शुल्क आकारुन अर्ज करता येतो. त्यापुढील तीन महिन्यात दुप्पट शुल्क भरून नियंत्रकाच्या मान्यतेने परवान्याचे नूतनीकरण करण्यासाठी अर्ज करता येतो, वाढीव मुदत संपेपर्यंत परवानाधारकाने नूतनीकरणासाठी अर्ज केला नाही तर त्याचा परवाना आपोआप रद्द होतो.

e) **आवेष्टित वस्तू उत्पादक/ आवेष्टक/ आयातदार नोंदणी-** आवेष्टित वस्तूंचे उत्पादन/आवेष्टन/आयात करणा-या सर्वांना याबाबतची नोंदणी करणे बंधनकारक आहे. यासाठी प्राईवेट लिमिटेड व लिमिटेड संस्था यांची नोंदणी नियंत्रक कार्यालयात करण्यात येते व इतर सर्वांची नोंदणी नोंदणीकृत कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्ह्याचे सहायक नियंत्रक कार्यालयात करण्यात येते.

f) **आवेष्टित वस्तू उत्पादक/ आवेष्टक/ आयातदार यांच्या संक्षिप्त पत्याची नोंदणी करणे** - आवेष्टित वस्तू उत्पादक/आवेष्टक/आयातदार यांच्या संक्षिप्त पत्याची नोंदणी नियंत्रक कार्यालयात करण्यात येते.

(इ) वजन व माप आणि आवेष्टित वस्तू नियम विषयक तरतुदींचा भंग- खोट्या वजनमापांचा वापर, कमी माल देणे, अधिक मालाची मागणी करणे, आवेष्टित वस्तुंची छापिल किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री करणे, त्यावरील मूळ किमतीमध्ये खाडाखोड करणे व पाकीटात माल कमी आढळणे, आवेष्टित वस्तूवर आवश्यक उदघोषणा न छापणे इत्यादी बाबींमध्ये ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे आढळून आल्यास वा वैध मापन शास्त्र विषयक तरतुदींचा भंग होत असल्यास निरीक्षक संबंधितांविरुध्द कारवाई करतात. ग्राहकास व सर्वसाधारण जनतेस या बाबी आढळून आल्यास अथवा याबाबतीत तक्रारी असल्यास कार्यालयीन वेळेत तक्रार नोंदवीण्यासाठी यंत्रणेने स्वतंत्र दुरध्वनी (०२२-

२२८८६६६६) उपलब्ध करुन दिलेला आहे. याव्यतिरिक्त माहितीसाठी व तक्रार नोंदविण्यासाठी स्वतंत्र legalmetrology.maharashtra.gov.in हा संकेत स्थळ ग्राहकासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. जिल्हापातळीवर तक्रार नोंदविण्यासाठी जिल्हा सहायक नियंत्रक यांचे दुरध्वनी क्रमांक संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

ई) वैधमापनशास्त्र यंत्रणेमार्फत करण्यात येणारी कार्ये, जबाबदार अधिकारी, कार्यपूर्ती कालावधी व याबाबत तक्रार विषयी अधिकारी यांचा तपशिल.

अ. क्र.	कार्यसूची	जबाबदार अधिकारी/ कर्मचारी	कार्यपूर्तीचा कालावधी	तक्रार कोणाकडे करावी.
१.	वजन माप उत्पादक, दुरुस्तक, विक्रेते यांच्या गैरवर्तणुकी विरुध्दच्या तक्रारी.	उप नियंत्रक	१ महिना	नियंत्रक
२.	कार्यालयीन/शिबीर कार्यालयातील वजन मापांच्या पडताळणीबाबत.	निरीक्षक	त्याच दिवशी किंवा लगतच्या कार्यालयीन दिवशी	सहायक नियंत्रक
३.	वजन माप उत्पादकांना उत्पादन, विक्री व दुरुस्ती अर्जानुसार परवाना देणे तसेच महाराष्ट्र राज्य किंवा एकापेक्षा जास्त प्रादेशिक विभागांसाठी दुरुस्ती परवना देणे, (संपूर्ण कागदपत्रांसह अर्ज केल्यास).	उप नियंत्रक, मुख्यालय	४५ दिवस	नियंत्रक
४.	वजन माप दुरुस्तक यांना प्रादेशिक विभागासाठी अर्जानुसार परवाना देणे (संपुर्ण कागदपत्रांसह अर्ज केल्यास).	प्रादेशिक उप नियंत्रक	४५ दिवस	नियंत्रक
५.	संबंधित जिल्हयात नोंदणीकृत आस्थापना/कार्यशाळा असणारे वजन माप विक्रेते यांना अर्जानुसार परवाना देणे व संबंधित जिल्हयात नोंदणीकृत आस्थापना/कार्यशाळा असणारे व उप नियंत्रक यांनी दिलेले वजन माप दुरुस्तक परवाने नूतनीकरण करणे (संपूर्ण कागदपत्रांसह अर्ज केल्यास).	जिल्हा सहायक नियंत्रक	४५ दिवस	प्रादेशिक उप नियंत्रक
६.	आवेष्टित वस्तू उत्पादक/आवेष्टक/ आयातदार यांची नोंदणी.	उप नियंत्रक, मुख्यालय/ जिल्हा सहायक नियंत्रक.	७ दिवस	नियंत्रक/ विभागीय उप नियंत्रक.
७.	त्यानी दिलेल्या परवान्यांचे नुतनीकरण करणे. (संपुर्ण कागदपत्रांसह अर्ज केल्यास).	नियंत्रक	१ महिना	
८.	वजन माप विषयक तरतुदीच्या भंगाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी व त्याअनुषंगाने व्यापक कार्यवाही.	निरीक्षक	१ महिना	सहायक नियंत्रक.
९.	कनिष्ठ कार्यालयाच्या आदेशा विरुध्दच्या अपीलाबाबतची संपूर्ण कार्यवाही.	उप नियंत्रक	१ महिना	नियंत्रक

भाग-३

ग्राहक संरक्षण विभाग

उद्दिष्ट :- ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करून त्यांना न्याय मिळवून देणे.

संरचना :-

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग

↓

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग

(अ) राज्य ग्राहक संरक्षण परिषद :-

a) राज्यातील ग्राहकांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ नुसार राज्य ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.

b) शासनाच्या दि.०६.०८.२००९ च्या अधिसूचनेनुसार राज्य ग्राहक संरक्षण परिषदेची सदस्य संख्या -३८

c) मा.मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) हे या परिषदेचे अध्यक्ष आहेत.

d) राज्यस्तरीय ग्राहक संरक्षण परिषदेचा कालावधी ३ वर्षाचा आहे.

e) शासन अधिसूचना दि. ३.९.२०१४ अन्वये २६ सदस्यीय राज्य ग्राहक संरक्षण परिषद गटीत करण्यात आली आहे. यातील १७ सदस्य शासकीय असून उर्वरित सदस्य अशासकीय आहेत

(आ) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद :-

a) जिल्हा स्तरावरील ग्राहकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरीय ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.

b) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अध्यक्ष जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आहेत.

c) शासन अधिसूचना दि.०९ आक्टोंबर, २०१२ च्या अन्वये जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेमध्ये वेगवेगळया स्तरावरील ४० (१२ शासकीय व २८ अशासकीय) सदस्यांचा समावेश आहे.

d) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची मुदत तीन वर्षे इतकी आहे.

e) दि.१० डिसेंबर २०१२ च्या अधिसुचने अन्वये १२ शासकीय सदस्यांचा समावेश असलेली जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद सर्व जिल्हयांसाठी गठित करण्यात आली असुन सदर परिषदेचे कामकाज सुरु झाले आहे. सदर परिषदेवरील उर्वरित २८ अशासकीय सदस्यांच्या संदर्भात दिनांक १९ ऑक्टोंबर,२०१३ च्या शासन निर्णयान्वये निवडीचे निकष आणि कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

इ) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ ची अंमलबजावणी:-

१. ग्राहकांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या हेतूने केंद्र शासनाने दिनांक २४/१२/१९८६ रोजी ग्राहक संरक्षण कायदा अमलात आणला.

२. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अधिनियमात खालीलप्रमाणे यंत्रणा असावी, असे निर्देशित केले आहे:-

ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्याच्या दृष्टीने

१. केंद्रिय स्तरावर राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग,
२. राज्य स्तरावर राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व
३. जिल्हा स्तरावर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच

३. या अधिनियमानुसार अभिप्रेत असलेल्या राज्य स्तरावरील व जिल्हा स्तरावरील यंत्रणा राज्यात उभारण्यात आलेल्या आहेत. याबाबतचा तपशील थोडक्यात खालीलप्रमाणे आहे:-

अ. क्र.	मुद्दा	राज्य आयोग	जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच
१	अध्यक्ष	मा.उच्च न्यायालयाचे कार्यरत किंवा निवृत्त न्यायाधीश	कार्यरत/निवृत्त जिल्हा न्यायाधीश किंवा जिल्हा न्यायाधीश होण्याची अर्हता ज्या व्यक्तीकडे असेल अशी व्यक्ती
२	न्यायिक/ गैरन्यायिक सदस्यांची	५ न्यायिक, ६ गैरन्यायिक	प्रत्येक जिल्ह्याकरिता न्यायिक व गैरन्यायिक दोन्ही मिळून २
३	मुख्यालय	मुंबई आणि नागपूर व औरंगाबाद येथे परिक्रमा खंडपीठ (Circuit Bench)	प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी
४	दाखल करण्यात येणाऱ्या दाव्यांची किंमत	रु.२० लाख ते रु.१ कोटी पर्यंत	रुपये २० लाख पर्यंत

ई) राज्य ग्राहक हेल्पलाईन :-

राज्य शासनाने हेल्पलाईन कार्यान्वित करण्यासाठी कन्झ्युमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई या संस्थेच्या सहकार्याने दिनांक १५ सप्टेंबर २०११ पासून हेल्पलाईन कार्यान्वित करण्यात आली आहे.

ग्राहकांना विनाशुल्क टेलिफोनव्दारे त्यांच्या समस्येबद्दल असलेली माहिती/सल्लागार/ मार्गदर्शन मिळण्यासाठी राज्य ग्राहक हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. या हेल्पलाईनद्वारे राज्यातील ग्राहकांना मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेमध्ये सल्ला उपलब्ध होणार आहे. राज्य ग्राहक **हेल्पलाईनचा टोल फ्री क्र.१८०० २२ २२६२ असा आहे.**